# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

## Mumbai District Central Co-op Bank Ltd.

**H.O. Mumbai Bank Bhavan, 207 Dr, D. N Road, Fort, Mumbai- 400 001**

# Recruitment of Management Cadre

Mumbai Bank Invites Offline Application for the Post of

| Post | No. of Post | Department |
|---|---|---|
| Dy. General Manager | 1 | Information Technology |
| Asst. General Manager | 3 | 1) Information Technology – 1 Post<br>2) Legal – 1 Post<br>3) ALM/ Risk Management – 1 Post |

For details like Qualification, Experience, Pay Scale, Procedure etc. refer Bank Website : www.mumbaidcc.bank.in

Last Date for submission of application is 16/01/2026

Sd/-
Managing Director

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.**
**''मुंबै बँक भवन'', २०७ डॉ.डी.एन.रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१**
****************

## पाहिजेत

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये खालील नमूद पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **अ.क्र** | **पद** | **विभाग** | **पदांची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | उपसरव्यवस्थापक | संगणक (माहिती व तंत्रज्ञान) | ०१ |
| २ | सहाय्यक सरव्यवस्थापक | १) संगणक (माहिती व तंत्रज्ञान) – (१ पद)<br>२) कायदा – ( पद १)<br>३) ॲसेट लायबिलिटी/ जोखीम व्यवस्थापन ( पद १) | ०३ |
| | | **एकूण** | **०४** |

टिप :– अर्ज करण्याची कार्यपध्दती, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वेतन श्रेणी इत्यादी माहितीकरीता बँकेची वेबसाईट : www.mumbaidcc.bank.in पाहावी.

अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख : १६/०१/२०२६

सही/–
**कार्यकारी संचालक**

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

**''मुंबै बँक भवन'', २०७ डॉ.डी.एन.रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१**

***********

## पाहिजेत

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये वरिष्ठ श्रेणीतील खालील नमूद पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पद | विभाग | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | उपसरव्यवस्थापक | माहिती व तंत्रज्ञान | ०१ |
| २ | सहाय्यक सरव्यवस्थापक | ४) माहिती व तंत्रज्ञान – (१ पद)<br>५) कायदा – (पद १)<br>६) ॲसेट लायबिलिटी/ जोखीम व्यवस्थापन ( पद १) | ०३ |
| | | **एकूण** | **०४** |

यासंदर्भात बुधवार, दि.३१/१२/२०२५ रोजी टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व गुरुवार, दि.०१/०१/२०२६ रोजी महाराष्ट्र टाईम्स (मराठी) या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली आहे. पदांबाबतची माहिती / तपशिल / अर्हता / प्रक्रिया इत्यादी बाबी खाली नमूद केल्या आहेत. इच्छुक उमेदवारांनी खालील नमूद संपूर्ण तपशिलासह बँकेचे खालील नमूद पत्त्यावरती लेखी अर्ज सादर करावेत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.१६/०१/२०२६ आहे याची नोंद घ्यावी.

# MUMBAI DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LIMITED

## RECRUITMENT

Mumbai District Central Co-operative Bank Ltd. invites application for the Management Post from eligible candidates as detailed below

| Post | No. of Post | Department |
|---|---|---|
| Dy. General Manager | 1 | Information Technology |
| Asst. General Manager | 3 | 1) Information Technology – 1 Post<br>2) Legal – 1 Post<br>3) ALM/ Risk Management – 1 Post |

Advertisement regarding the same is published in the daily News Papers, Times of India (English) on Wednesday, 31/12/2025 and Maharashtra Times (Marathi) on Thursday, 01/01/2026 Mumbai. For details like Qualification, Experience, Pay Scale, /procedure etc. refer information mentioned below. Last date for submission of /application is **16/01/2026**.

पदनिहाय शैक्षणिक अर्हता इतर अर्हता उदा. वय, अनुभव, वेतनश्रेणी तसेच इतर अटी व शर्ती, पदांची संख्या याबाबतचा तपशिल : –

| अ.क्र | पद | विभाग | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | **उपसरव्यवस्थापक**<br>**Dy. General Manager** | माहिती तंत्रज्ञान<br>Information Technology | ०१ |
| २ | **सहाय्यक सरव्यवस्थापक**<br>**Asst. General Manager** | माहिती तंत्रज्ञान – Information Technology (१),<br>कायदा – Legal (१),<br>अल्को/ रिस्क – ALM / Risk Management (१) | ०३ |

| अ. क्र. | पदनाम | विभाग | शैक्षणिक अर्हता व अनुभव | वय (जाहिरात दिनांकारोजी) | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपसरव्यवस्थापक<br>**Dy. General Manager** | संगणक<br>Information Technology | मान्यताप्राप्त विद्यापीठाची BE/ B Tech (Computer, IT), /MCA/MCS/ Msc Computer Science / IT. इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशन मधील पदवी (अभियंता) . पदवी मिळविण्याकरीता पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून अभ्यासक्रम पूर्ण केला असणे आवश्यक आहे. तसेच अभ्यासक्रम पूर्ण केलेली संस्था ATCTE मान्यता प्राप्त असावी, तसेच CEH /CISM प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.<br>**अनुभव** :<br>किमान १० वर्षाचा बँकेच्या संगणक विभागातील वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव आवश्यक, उमेदवाराला बँकेमधील संगणक प्रणालीच्या संचालनाशी संबंधित सर्व बाबींचा पूर्ण अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच बँकिंग क्षेत्रामध्ये वापरले जाणारे अद्यावत तंत्रज्ञानाविषयी माहिती असणे आवश्यक आहे. सायबर सुरक्षा व बँकेमधील आय.टी.क्षेत्राशी संबंधित सर्व नियामक संस्थांच्या मार्गदर्शक सुचनांची माहिती व अंमलबजावणी, पूर्तता संदर्भात अद्यावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>CISO म्हणून बँकेमध्ये काम केलेले असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | **४५ ते ५५ वर्षे** | **१२०००/ –<br>५५०/५<br>१४७५०<br>६२५/५<br>१७८७५<br>७००/५<br>२१३७५<br>७७५/५<br>२५२५०<br>८५०/५<br>२९५००<br>९२५/५<br>३४१२५<br>३० वर्षे** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | सहाय्यक सरव्यवस्थापक Asst. General Manager | संगणक Information Technology | मान्यताप्राप्त विद्यापीठाची BE/ B Tech (Computer, IT), MCA/MCS/ Msc Computer Science / IT. इलेक्ट्रॉनिक व टेलिकम्युनिकेशनमधील पदवी (अभियंता). पदवी मिळण्याकरीता पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून अभ्यासक्रम पूर्ण केला असणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्था AICTE मान्यता प्राप्त असावी. तसेच CEH /CISM प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य.<br><br>**अनुभव** :<br>किमान ०७ वर्षाचा बँकेतील संगणक विभागातील वरिष्ठ / मध्यम व्यवस्थापनातील अनुभव आवश्यक<br>बँकिंग क्षेत्रामध्ये वापरले जाणारे अद्यावत तंत्रज्ञानाविषयी माहिती असणे आवश्यक आहे.<br>सायबर सुरक्षा व बँकेमधील आय.टी.क्षेत्राशी संबंधित सर्व नियामक संस्थांच्या मार्गदर्शक सुचनांची माहिती व अंमलबजावणी, पूर्तता संदर्भात अद्यावत ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>CISO म्हणून बँकेमध्ये काम केलेले असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | **४५ ते ५५ वर्षे** | **९६००<br>४७५/५<br>११९७५<br>५५०/५<br>१४७२५<br>६२५/५<br>१७८५०<br>७००/५<br>२१३५०<br>७७५/५<br>२५२२५<br>८५०/५<br>२९४७५<br>३० वर्षे** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सहाय्यक सरव्यवस्थापक<br>Asst. General Manager | कायदा<br>Legal | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कुठल्याही शाखेतील प्रथम / द्वितीय श्रेणीतील पदव्यूत्तर पदवी व एल.एल.बी.(३ वर्षे)/ एल.एल.एम.<br>विशेष अर्हता/प्राधान्य<br>JAIIB / CAIIB / DBM / C-PEC (Certified Professional in Co-operative Banking)<br>**अनुभव :**<br>किमान ०७ वर्षाचा बँकेच्या कायदा विभागातील मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव आवश्यक.<br>सरफेसी, महाराष्ट्र सहकारी कायदा व अधिनियम, डीआरटी, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, ग्राहक संरक्षण कायदा, निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट ॲक्ट इत्यादी कायद्याची सखोल माहिती असणे आवश्यक. | **४५ ते ५५ वर्षे** | **९६००<br>४७५/५<br>११९७५<br>५५०/५<br>१४७२५<br>६२५/५<br>१७८५०<br>७००/५<br>२१३५०<br>७७५/५<br>२५२२५<br>८५०/५<br>२९४७५<br>३० वर्षे** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | सहाय्यक सरव्यवस्थापक Asst. General Manager | ॲसेट लायबिलिटी/ जोखीम व्यवस्थापन | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कुठल्याही शाखेतील प्रथम / द्वितीय श्रेणीतील पदव्यूत्तर पदवी<br>विशेष अर्हता/प्राधान्य :–<br>CA/MBA-Finance /M.Com./ JAIIB / CAIIB/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) , CFA, CPA, CMA, ACCA, CAIA, CFP<br>**अनुभव** :<br>किमान ०७ वर्षाचा बँकेच्या मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील अनुभव आवश्यक बँकेच्या ALM व जोखीम व्यवस्थापन विभागामध्ये काम केले असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | **४५ ते ५५ वर्षे** | **९६०० ४७५/५ ११९७५ ५५०/५ १४७२५ ६२५/५ १७८५० ७००/५ २१३५० ७७५/५ २५२२५ ८५०/५ २९४७५ ३० वर्षे** |

✻ **प्राधान्य क्रम –** शैक्षणिक अर्हता प्रथम तद्नंतर अनुभव.

पदनामानुसार मिळणाऱ्या वेतनाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :–

१. **उपसरव्यवस्थापक : DGM (Deputy General Manager)**

- उमेदवारी कालावधी ६ महिने. त्यामध्ये मिळणारे वेतन – सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए) कमाल ५०% वेतन = दरमहा रू.६२,९०६/–
- उपरोक्तप्रमाणे उमेदवारी कालावधी पूर्ण केल्याचे नंतर मिळणारे सुरुवातीचे वेतन – सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए + एचआरए + सीसीए) = दरमहा रू.१,३९,१०३/– व त्या त्या वेळेचे नियमानुसार मिळणारे भत्ते व इतर सवलती.

सेवेत कायम झाल्याचे नंतर त्या त्या वेळचे वेतन करारानुसार विविध सवलती व सोयी सुविधा देण्यात येतील. उदा. ग्रॅज्युईटी, प्रॉव्हीडंट फंड, रजा, मेडीकल, प्रवासभत्ता व इतर भत्ते, सवलतीच्या दरातील कर्जे इत्यादी.

**सहाय्यक सरव्यवस्थापक**

**Asst. General Manager**

- उमेदवारी कालावधी ६ महिने. त्यामध्ये मिळणारे वेतन – सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए) कमाल ५०% वेतन = दरमहा रू.५८,८३९/–
- उपरोक्तप्रमाणे उमेदवारी कालावधी पूर्ण केल्याचे नंतर मिळणारे वेतन – सदर पदाकरीताच्या मुळ वेतनावर आधारीत (बेसिक + डीए + व्हिडीए + एचआरए + सीसीए) = दरमहा रू.१,३०,०६२/– व त्या त्या वेळेचे नियमानुसार मिळणारे भत्ते व इतर सवलती.

सेवेत कायम झाल्याचे नंतर त्या त्या वेळचे वेतन करारानुसार विविध सवलती व सोयी सुविधा देण्यात येतील. उदा. ग्रॅज्युईटी, प्रॉव्हीडंट फंड, रजा, मेडीकल, प्रवासभत्ता व इतर भत्ते, सवलतीच्या दरातील कर्जे इत्यादी.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :–**

१) उमेदवार भारतीय नागरिक असावा व महाराष्ट्रात १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचे कायम स्वरुपी वास्तव्य असावे.

२) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

३) निवडीनंतर उमेदवारांना स्वखर्चाने वैद्यकिय चाचणीसाठी जावे लागेल. तसेच वैद्यकिय चाचणीचे शुल्क अदा करावे लागेल. वैद्यकिय चाचणीत पात्र झाल्याशिवाय त्यांना नेमणूक दिली जाणार नाही. वैद्यकिय चाचणीचे ठिकाण निवड झालेल्या उमेदवारांना कळविण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड झाल्यास उमेदवारीचा कालावधी ६ महिने इतका राहील. तद्नंतर उमेदवारी कालावधीमध्ये समाधानकारक सेवा असल्यास सेवेत कायम करण्यात येईल.

५) उमेदवारी कालावधीतील सुट्टया :– उमेदवारी कालावधीतील अधिकाऱ्याला ६ महिन्यात फक्त ६ दिवसांची पूर्ण पगारी किरकोळ रजा उपभोगता येईल. या व्यतिरिक्त त्यांनी घेतलेल्या रजा हया बिनपगारी असतील. तसेच उमेदवारी कालावधी पुढे जाईल म्हणजेच उमदेवारीचा कालावधी वाढेल. बिन पगारी रजेवर राहण्याची प्रवृत्ती आढळल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

६) सानुग्रह अनुदान / बोनस :– उमेदवारी कालावधीत कर्मचारी / अधिकाऱ्याला कोणत्याही प्रकारचे सानुग्रह अनुदान/ बोनस दिला जाणार नाही.

७) प्रॉव्हीडंट फंड :– प्रॉव्हीडंट फंड कायद्यानुसार प्रॉव्हीडंट फंड सुविधा देण्यात येईल.

८) ग्रॅज्युईटी :– सेवेत कायम झाल्याचेनंतर ग्रॅज्युईटी कायद्यानुसार लागू असलेले लाभ दिले जातील.

९) थेट भरतीद्वारे बँकेच्या सेवेत येणाऱ्या उमेदवारांनी उमेदवारीच्या कालावधीत रोजच्या रोज कामाची दैनंदिनी ठेवली पाहिजे व बँकेचे मा.कार्यकारी संचालक / मा.मुख्य सरव्यवस्थापक यांना कामकाजाचा साप्ताहिक अहवाल तपासणीसाठी उपलब्ध करुन दिला पाहिजे. संबंधित अधिकाऱ्याचे शेरे लक्षात घेवून उमेदवारी कालावधी अखेर एक गोपनिय अहवाल तयार केला जाईल. सदर कालावधीमध्ये कर्मचाऱ्याचे कामकाज कमी प्रतीचे (असमाधानकारक) आढळल्यास अशा कर्मचाऱ्यांचा उमेदवारी कालावधी पुढील सहा महिन्यासाठी वाढविला जाईल किंवा कोणतेही कारण न देता संबंधिताला सेवेतून कमी करण्यात येईल. याबाबत अंतिम निर्णय बँक व्यवस्थापनाचा राहिल.

१०) उमदेवाराने उमेदवारी कालावधीकरीता सेवेत रुजु होण्यापूर्वी शैक्षणिक पात्रतेचे दाखले, जन्म तारखेचा दाखला व जातीचे सक्षम अधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र, रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनरकडील शारीरिकदृष्टया बँकेचे काम करण्यास सक्षम असल्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. याबाबत बँकेकडून खातरजमा केली जाईल. यामध्ये माहिती खोटी असल्याचे आढळल्यास बँकेची फसवणूक केली असे गृहीत धरुन सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

११) बँकेच्या सेवेत रुजू होताना कर्मचाऱ्याने ३ वर्षाचा बॉण्ड लिहून देणे आवश्यक आहे. तसेच सदर कालावधीमध्ये उमेदवार नोकरी सोडून जात असल्यास त्याने एक महिन्याची नोटीस व रु.५०,०००/– इतकी रक्कम बँकेकडे जमा केल्यानंतरच त्याचा राजीनामा मंजूर होईल.

१२) बँकेच्या सेवेत रुजू होणाऱ्या सर्व उमेदवारांना बँकेचे सेवानियम व स्थायी आदेश यामधील अटी व नियम बंधनकारक राहतील.

१३) खालील नमुद विहीत नमुन्यामध्ये अर्ज बँकेकडे सादर करताना सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करण्यात यावेत. तसेच लिफाफ्यावरती "भरतीकरीता अर्ज व पदाचे नाव" स्पष्ट नमूद करावे. अर्ज मा.कार्यकारी संचालक, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित यांना अग्रेसित करावेत.

१४) भरती प्रक्रियेमध्ये प्राप्त अर्जाची छाननी बँकेकरवी केली जाईल. तद्नंतर बँकेस योग्य वाटणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलाविले जाईल. निवडीबाबतचा अंतीम निर्णय सर्वस्वी बँकेचा असेल. याबाबत कोणताही वाद / हरकती यांस बँक बांधील नाही.

१५) मुदत दिनांकानंतर प्राप्त अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच ई–मेल, फॅक्स इत्यादीव्दारे सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. रजिस्टर पोस्टाने पाठविलेले अर्ज उशिराने पोहोचल्यास अथवा गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी बँकेवर असणार नाही.

१६) विहित नमुन्यातील अर्ज रजिस्टर पोस्टाने पाठवावेत अथवा बँकेचे खालील नमूद पत्यावर सिलबंद लिफाफ्यामध्ये प्रत्यक्ष सादर करावेत. कुरियरने पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. अर्जाकरीताच्या सिलबंद लिफाफ्यावर ज्या पदाकरीता अर्ज केला आहे ते पदनाम स्पष्टपणे नमूद करावे. तसेच लिफाफ्यावर खालील नमूद तपशिलाप्रमाणे बँकेचा पत्ता नमूद करावा.

१७) अर्जाचा नमुना

उमेदवाराचा फोटो

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १ | ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचे नाव | |
| २ | उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| ३ | उमेदवाराच्या वडिलांचे संपूर्ण नाव | |
| ४ | उमेदवाराच्या आईचे संपूर्ण नाव | |
| ५ | उमेदवाराची जन्मतारीख (dd/mm/yyyy) | |
| ६ | उमेदवाराचे अर्ज दिनांकारोजी वय | |
| ७ | उमेदवाराचे लिंग (स्त्री / पुरुष ) | |
| ८ | उमेदवाराची वैवाहिक स्थिती | |
| ९ | उमेदवाराचा आधार क्रमांक | |
| १० | उमेदवाराचा पॅनकार्ड क्रमांक | |
| ११ | उमेदवाराचा भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक | |
| १२ | उमेदवाराचा दूरध्वनी क्रमांक (असल्यास) | |
| १३ | उमेदवाराचा ई–मेल आय डी | |
| १४ | उमेदवाराचा वास्तव्याचा तपशिलवार पत्ता (अर्जासोबत वास्तव्याबाबतचा पुरावा सादर करावा.) | |
| १५ | उमेदवाराची शैक्षणिक पात्रता संपूर्ण तपशिलासह. उदा.एस.एस.सी./शालांत परिक्षा / बारावी अथवा इंटरमिजीएट / पदवी / पदव्युत्तर पदवी / व्यावसायिक पदवी इत्यादी. यामध्ये शैक्षणिक आस्थापना / बोर्ड / युनिर्व्हसिटी / मिळालेले गुण / टक्केवारी / उत्तीर्ण केल्याचे वर्ष इत्यादी. | |
| १६ | उमेदवाराचा अनुभव संपूर्ण तपशिलासह. उदा. अस्थापनेचे नाव/अस्थापनेचा पत्ता संपर्क क्रमांकासह/ ग्रहण केलेले पद/ कालावधी इत्यादी. | |

- अर्जदाराने स्वत:चा पासपोर्ट साईज फोटो अर्जावरती लावावा. फोटो दि.०१ जून २०२५ नंतर काढलेला असावा व ती तारीख फोटोसोबत नमूद असावी.
- अर्जदाराने अर्जासोबत शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्राचे दाखल्यांच्या व तसेच आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादीच्या स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रती जोडाव्यात. यामध्ये :
    १. जन्मतारखेकरीता पुरावा – जन्मदाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्याचा दाखला यापैकी एक.
    २. शैक्षणिक अर्हता, यामध्ये अर्जदाराने नमूद केलेल्या तपशिलाबाबतचे पुरावे.
    ३. आधारकार्ड स्वसाक्षांकित छायाकिंत प्रत.
    ४. पॅनकार्ड स्वसाक्षांकित छायाकिंत प्रत.
    ५. नावामध्ये बदल असल्यास संबंधीत राजपत्राची (गॅझेट) प्रत.
- एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचे झाल्यास स्वतंत्र अर्ज करावा.
- अर्ज मराठी अथवा इंग्रजी भाषेतूनच करावेत. अन्य भाषेतील अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
- अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख – दिनांक १६/०१/२०२६<br>सदर तारखेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.
- अर्ज पुढील पत्त्यावरती रजिस्टर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष सादर करावेत.

१८) मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची सूची बँकेच्या अधिकृत वेबसाईटवर जाहिर करण्यात येईल.

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित**

अर्ज प्रत्यक्ष सादर करावयाचे झाल्यास उपरोक्त पत्त्यावर सकाळी १०.१५ ते संध्याकाळी ५.१५ वाजेपर्यंत स्विकारले जातील. (सार्वजनिक सुट्या, रविवार, प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार वगळून) अर्ज सिलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे. सादर केलेल्या अर्जाची पोच दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अर्ज सादर करणेकरीता कार्यालयीन पत्ता :

**कार्यकारी संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी**

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.**
**''मुंबै बँक भवन'' २०७, डॉ.डी.एन.रोड,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**
**दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६१७१५४ ते ५९**